पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक २६**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २९/९/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. ५३६**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील दि. १/८/२०२० ते दि.३१/८/२०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांचे जा.क्र. समआ–४/२२४३ दि.१८/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५३७**

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांच्या माहे ऑगस्ट २०२० चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/३०० दि.२३/९/२०२० चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ५३८**

मा.सचिन दोडके व मा.अविनाश बागवे यांचे दि. २१/९/२०२० चे पत्र.

महाराष्ट्र शासनाने सैनिकांना व माजी सैनिकांना स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये मिळकतकर माफी जाहिर केली असुन त्याची अंमलबजावणी पुणे महानगरपालिकेनी तात्काळ करावी व पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये राहणाऱ्या माजी सैनिकांना मिळकतकर (टॅक्स) माफ करण्यात यावा.

**विषय क्र. ५३९**

मा.सचिन दोडके व मा.अविनाश बागवे यांचे दि. २१/९/२०२० चे पत्र.

कोरोनाच्या पार्श्वभुमीवर पुणे शहरातील नागरिक मोठ्या आर्थिक समस्येत सापडले आहेत त्यांना दिलासा देण्याकरिता पुणे महानगरपालिकेने मिळक़तकर (टॅक्स) मध्ये अभय योजना (सवलत) देवून त्यांचा (मिळक़तकर) टॅक्स बिल कमी करण्यात यावा, तसेच व्याज माफी व सवलतीची बिल (टॅक्स पावती) पुणेकर नागरिकांना देण्यात यावे.

**विषय क्र. ५४०**

मा.दिलिप वेडेपाटील व मा.प्रकाश ढोरे यांचे दि.२२/९/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेने स्वयंसेवकांमार्फत कोवीड २०१९ रुग्णशोध सर्व्हे केला. संपुर्ण जगात हाहाकार माजवुन जग कोवीड २०१९ या महामारीने ग्रासलेले आहे. हे आपणा सर्वांना ज्ञात आहेच तरी या महामारीचा संपुर्ण नायनाट करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने स्वयंसेवकांना सर्व्हे करणेचे काम देण्यात आले होते सदर सर्व्हे करताना त्यांनी जीवावर उदार होवून काम केले परंतु त्या जोखमीच्या काम करत असताना मोबदला म्हणुन मिळणारे मानधन अत्यंत कमी प्रमाणात दिले जात आहे.

तरी कोविड सारख्या महामारीचा सामना करत स्वत:च्या जिवावर उदार होवुन काम करणाऱ्या या सर्व स्वयंसेवकांना २ रु. ऐवजी ५ रु. प्रति घर असे मानधन मिळावे.

**विषय क्र. ५४१**

मा.अरविंद शिंदे यांचे दि.२३/९/२०२० चे पत्र.

घनकचरा व्यवस्थापन विभाग भ्रष्टाचाराने किती पोखरला आहे याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मा.स्थायी समिती यांची दिनांक २२/९/२०२० रोजीच्या कार्यपत्रिकेतील विषय क्र. ५३३ आहे. प्रचलित बाजारभावानुसार चेन बुलडोझर मशिनची किंमत रु. १.७१ कोटी असताना अवघ्या रु. १३ लाख किंमतीचे कालबाह्य म्हणजेच जवळपास ३० वर्षा पुर्वीचे स्क्रॅप चेन बुलडोझर मशिनच्या तांत्रिक कार्यक्षमतेचे प्रमाणपत्र न घेता प्रशासनाने सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती यांच्याकडे मान्यतेकरिता दाखल केलेला आहे.

रु. १३ लाख या किंमतीमध्ये खरेदी केलेल्या चेन बुलडोझर मशिनच्या भाडयापोटी पुणे मनपाने मे.नॅशनल अर्थ मुव्हर्स या ठेकेदारास आजतागायत सुमारे रु. १५ कोटी हून अधिक रक्कम अदा केली आहे. सदर भाडे रक्कमेत मनपास स्व:मालकीचे किमान ८ चेन बुलडोझर मशिन खरेदी करता आले असते.

मे.नॅशनल अर्थ मुव्हर्स या ठेकेदाराने टेंडर प्रक्रियेत दाखल केलेल्या चेन बुलडोझर मशिन खरेदीच्या पावत्या स्क्रॅप बुलडोझरच्या आहेत. सदर मशिनचे उत्पादन वर्ष प्रशासनास आजही माहित नाही. सदर मशिन कमी दरात मिळत असल्याचे दर्शवून प्रशासन पुणे मनपाची पर्यायाने करदात्या पुणेकरांची फसवणूक करीत आहे.

सदर चेन बुलडोझर मशिनच्या तांत्रिक कार्यक्षमतेची व कालबाह्य नसल्याची खातरजमा सक्षम शासकीय संस्थेकडून तपासून घ्यावी व तद्नंतर सदर प्रस्तावाचा विचार करण्यात यावा.

**विषय क्र. ५४२**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे व मा.सौ.सोनाली लांडगे यांचे दि.२३/९/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेमध्ये गेल्या 6 महिन्यापासून पुणे शहरात कोरोनाची जी परिस्थिती उद्भवलेली □ावर पुणे महानगरपालिकेच्या वतीने अनेक कर्मचारी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता तसेच त्यांच्या कुटुंबाची पर्वा न करता जीव धोक्यात घालून नागरीकांमध्ये कोरोनाचा प्रचार व प्रसार रोखावा तसेच नागरीकांच्या जीवाची हानी होवू न□. □ासाठी अहोरात्र काम करीत आहेत. □ा कर्मचा-□ांना जे पुणे शहरात जवळजवळ 3500 कर्मचारी आहेत. हे पुणे महानगरपालिकेमध्ये का□म स्वरूपी सेवक नसून ठेकेदार पध्दतीने पुणे महानगरपालिकेची सेवा करीत आहेत. उदा. झाडणकाम कर्मचारी, अतिक्रमण मधील कर्मचारी , सुरक्षा विभागातील कर्मचारी, आरोग्य विभागातील कर्मचारी हे पुणे महानगरपालिकेच्या विविध कोव्हीड सेंटर व दवाखाने, प्रसूतीगृहे कोरोनाच्या आस्थापना पुणे महानगरपालिकेच्या विविध भवन □ाठिकाणी हे कर्मचारी गेली 6 महिने आपली सेवा देत आहेत. □ाचबरोबर पुणे मनपाच्या समाज विकास विभाग मार्फत समुहसंघटिका व आशा वर्कस् □ा देखील 6 महिने का□ करीत आहेत. □ा कर्मचा-□ांना पुणे महानगरपालिकेच्या वतीने कोणत्याही प्रकारचे आरोग्याच्या संरक्षणाचा लाभ होत नाही.

एवढेच नाही तर □ा कर्मचा-□ांना दोन ते तीन महिने वेतन अदा केले जात नाही. □ाहून पुढे □ा कर्मचा-□ांना कामावर घेण्याचे आदेश देखील दिलेली नाही. □ाची माहिती घेतल्या नंतर असे लक्षात आले की पुणे महानगरपालिकेच्या संबंधित खातेप्रमुखांकडून व आपल्या वरीष्ठ अधिका-□ांकडून नुसते कागदी घोडे नाचविण्याचे काम होत आहे. □ा प्रशासकी□ दिरंगाईचा फटका □ा कर्मचा-□ांना होत आहे.

तरी मा. महापालिका आ□ुक्त □ांनी □ा संपूर्ण प्रकरणामध्ये तात्काळ लक्ष घालून संबंधित मा.अति.महापालिका आ□ुक्त व खातेप्रमुख □ांना तात्काळ आदेश देवून □ांची रखडलेले वेतन त्वरीत अदा करणेस तसेच □ांची लवकरात लवकर कामावर रूजू करून घेण्याचे आदेश देणेत □ावेत. □ा कर्मचा-□ांना व त्यांच्या कुटुंबांना मोफत पुणे महानगरपालिकेतर्फे आरोग्य सुविधा देणे व प्रत्येक कर्मचा-□ाचे रू. 5 लाखाचे विमा उतरविणे. हे करावे व जे वरीष्ठ अधिकारी व खातेप्रमुख प्रशासकी□ दिरंगाई करीत आहेत त्यांच्यावर का□देशीर कारवाई करणेत □ावी व तसेच संबंधित अधिका-□ांचे वेतन रोखले जावे हे आदेश देणेत □ावे.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ५४३**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/८/२०२० ते दि.३१/८/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/२९२ दि.१८/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५४४**

दि. १७/८/२०२० ते दि. २३/८/२०२० अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १२ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/२९५ दि. २२/९/२०२० ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. ५४५**

दि. २४/८/२०२० ते दि. ३०/८/२०२० अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/२९६ दि. २२/९/२०२० ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. ५४६**

दि. १०/८/२०२० ते दि. १६/८/२०२० अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/२९७ दि. २२/९/२०२० ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. ५४७**

दि. ३/८/२०२० ते दि. ९/८/२०२० अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १६ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/२९८ दि. २२/९/२०२० ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. ५४८**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील पेठ महंमदवाडी सन २०१६–१७ व २०१७–१८ मधील दोराबजी मॉल या मिळकतीच्या आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/८५१ दि. १८/९/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १२ सन २०२०–२०२१ चा विचारासाठी.

## सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. ५४९**

पुणे म.न.पा. अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, बांधकाम विकास विभागाकडील अनधिकृत बांधकाम कारवाईकरिता व अतिक्रमण निर्मुलन कारवाईसाठी अकुशल मजूर पुरविणे (५ वर्षाकरिता) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार हेमंत व्ही.शहा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२८,०४,४५,५६८/– पेक्षा ०.००१% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. २८,०४,४८,३७२=४५६ या प्राप्त झालेल्या रकमेपैकी ३ वर्षाकरिता काम करून घेण्यासाठी अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ अदा करणेस, सदर काम अत्यावश्यक असल्याने या कामास प्राईस बीडच्या दिनांकापासून काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/२९४ दि.२२/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५५०**

कचरा डेपोमुळे पिण्याचे पाणी दुषित झालेल्या व पुणे मनपा मध्ये नव्याने समाविष्ठ फुरसुंगी गावामध्ये दैनंदिन १०० खेपा टँकरने पाणी पुरवठा करणे (२०२०–२१) (भाग २) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार जाधव ट्रान्सपोर्ट यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पु.ग.प.र.रु.९९,९३,४००/– पेक्षा ४.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९४,९४,७२९=३४ रकमेपर्यंत अथवा उपलब्ध रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/२९९ दि.२२/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५५१**

पुणे महानगरपालिकेच्या वैकुंठ, हडपसर व बावधान येथील स्मशानभुमीमध्ये पर्यावरणपुरक विद्युत शवदाहिनी पुरविणे व बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अल्फा इक्युपमेंट यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.१,९९,००,००१/– पेक्षा ५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,८९,०५,०००=९५ पर्यंत सर्व करांसह काम करुन घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/३०१ दि.२३/९/२०२० चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ५५२**

मा.अजय खेडेकर व मा.धनराज घोगरे यांचे दि. १७/८/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.२५ ब वानवडी येथील कै.नामदेव शिवरकर दवाखानामधील डायलेसिस सेंटरची उर्वरित कामे पूर्ण करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, पान क्र. २९१, यादी क्र.एसयु १, अ.क्र. २२५, बजेट कोड - सीई२६अे३३६/एसयु१-२२४, प्रभाग क्र. १२ क मधील थोरात उद्यान येथील म्युझिकल फाउंटनचे काम करणे | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, भवन विभागाकडील शाळा, दवाखाने, मार्केट, मनपा इमारती, कोठ्या, समाजमंदिरे, घाट, स्मशानभूमी, विसर्जन हौद इ.बाबत देखभाल दुरुस्तीची कामे करणे, पान क्र. १५३, (यादी क्र. एसआर १४), पान क्र. ११८, बजेट कोड- आरई२२अे११३/एसआर१४-१६८, प्रभाग क्र.२५ ब वानवडी येथील कै.नामदेव शिवरकर दवाखानामधील डायलेसिस सेंटरची उर्वरित कामे पूर्ण करणे | --- | २५ लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २५/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५५३**

मा.बापूराव कर्णेगुरुजी यांचे दि. ४/८/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.३ ड नगररोड क्षेत्रिय कार्यालयातील स.नं. १०३ महात्मा गांधीनगर येरवडा, पुणे ६ येथील रेडझोन (प्रतिबंधित) क्षेत्रातील ११७४ कुटूंबांना अन्नधान्याचे कीट देण्यासाठी आवश्यक ती र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, बजेट कोड - सीई२०ए१०२/एसए२-५५, प्रभाग क्र. ३ ड कलवड येथील मुख्य रस्त्याचे पुर्व भागातील रस्ते डांबरी करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.३ ड मधील ११७४ नागरिकांना अन्नधान्याचे ११७४ कीटचे वाटप करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २५/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५५४**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन/७१ दि.२०/५/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २५/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५५५**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २५/८/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५५६**

पुणे महानगरपालिका मा.मुख्य सभा ठराव क्र. ३११ दि.२८/८/२०१९ मधील संदर्भ क्र. ६ च्या देण्यात आलेल्या उपसूचनेनुसार पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्टवर सर्व पक्षनेत्यांचा समावेश करणेस व सभासद वाढविणेबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२३४ दि. १७/८/२०२० चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १५/९/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**संकीर्ण**

**विषय क्र. ५५७**

पुणे महापालिकेमार्फत बांधणेत आलेल्या बहुउद्देशिय हॉलच्या (मल्टीपर्पज हॉल) विनियोगाबाबतचे केलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या धोरणास (पॉलिसी) मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मा.व्य/१२२५,दि.१६/३/२०२० चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. २६ दि.२६/६/२०२० विचारासाठी.

**विषय क्र. ५५८**

पुणे पेठ स.नं.६७/६८ तळजाई मंदिराजवळ जलतरण तलाव क्रीडा संकुल व मल्टीपर्पज हॉल लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षा करीता चालविणेस देणेबाबत अ.क्र.१ चे निविदादार ज्ञानेश्वर पंढरीनाथ घनवट,तळजाई माता वसाहत,पुणे ९ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रु.१,३०,०००/-(र.रु.एक लाख तीस हजार फक्त) म.न.पा.ने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपक्षा र.रु.४९५१/- ने अधिक दराने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्ती नुसार निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचे सोबत करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/क्रीडा/२४५, दि. २४/८/२०२० चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ४० दि.११/९/२०२० विचारासाठी.

**विषय क्र. ५५९**

पुणे पेठ कोथरुड स.नं.१४३/३,१४४/३ थोरात उद्यानातील कै.वस्ताद बलभीम मोकाटे तलाव लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षा करीता चालविणेस देणेबाबत अ.क्र.१ चे निविदादार प्रबोधन विचारधारा कोथरुड,पुणे ९ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रु.५१,५५५/- (र.रु.एकावन्न हजार पाचशे पंचावन्न फक्त) म.न.पा.ने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपक्षा र.रु.८५०५/- ने अधिक दराने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्ती नुसार निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचे सोबत करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/क्रीडा/२५७, दि. २४/८/२०२० चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ४२ दि.११/९/२०२० विचारासाठी.

**विषय क्र. ५६०**

टेंडर क्र. २६५/२०१८-१९ नुसार पुणे मनपाकरीता कचरा वाहने चालविण्यासाठी ठेका पद्धतीने वाहनचालक सेवक घेणे ही निविदा दि. १५ ऑक्टोंबर २०२० अखेर पर्यत निविदा रक्कमेच्या वाढीव अंदाजे रक्कम रु.४,२५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. चार कोटी पंचवीस लाख फक्त ) पर्यत अथवा नविन निविदा मान्य दिनांकापर्यत यापैकी आधी होईल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देऊन मे. श्री एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (९.९९% ने जादा) निविदा रक्कमेच्या वाढीव रक्कमेपर्यत शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या नविन वाढीव डीए (महागाई भत्त्या) सह आवश्यकतेनुसार घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/२९३ दि.२१/९/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ५६१**

प्रभाग क्र. ३८ अ मधील बिबवेवाडी स.नं. ६५९ पार्ट येथील प्रसुतिगृह व प्राथमिक आरोग्य केंद्राचे इमारतीचे अर्धवट काम पुर्ण करुन कोव्हीड–१९ चे उपचाराकरिता तात्पुरत्या स्वरुपात ऑक्सीजन हॉस्पीटलची व्यवस्था करणेसाठी र.रु.३६५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/३०२ दि.२४/९/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (पथ) कार्यालय, CE20A1249/A6-211, पुणे शहरातील HCMTR रस्ते विकसीत करणे | ३६५ लक्ष | ---- |
| नविन सुचवलेले काम<br>अधिक्षक अभियंता (भवन) कार्यालय, प्रभाग क्र. ३८ अ मध्ये राजीव गांधी नगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह उभारणे, CE17A242/SJ6-375 | ---- | ३६५ लक्ष |

**विषय क्र. ५६२**

पुणे महापालिकेचे आरोग्य विभागाअंतर्गत असणाऱ्या सर्व दवाखाने/रुग्णालये/प्रसूतिगृहे या ठिकाणी देण्यात येणारी आरोग्य सेवा सुविधा दि.३०/११/२०२० अखेरपर्यंत मोफत करण्याची मुदत वाढवून मिळणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३०३ दि.२४/९/२०२० चे पत्र.

**प्रभारी नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सॲप द्वारे कळविण्यात येईल.**